दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ४५ मंगळवार दि.१९ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# नांदेडमध्ये ५ जण पावसाने दगावल्याची भीती, ४० जनावरांचा मृत्यू



नांदेड : प्रतिनिधी
मागील ४८ तासांत नांदेडमध्ये ढगफुटीसारखा पाऊस कोसळला. रात्रीत मुसळधार पाऊस कोसळल्यामुळे १८ फूट पाणी वाढले अन् सहा गावं पाण्याखाली गेली. एनडीआरएफकडून मदतकार्य सुरू आहे. पण मिळालेल्या माहितीनुसार, नांदेडमध्ये आतापर्यंत पाच जण दगावले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हसनाळमधील एक व्यक्ती आणि चार महिला पूराच्या पाण्यात बेपत्ता झाल्या आहेत. आतापर्यंत अनेकांना वाचवण्यात यश आले आहे. मुक्रमाबद येथे एका शेतक-याच्या शेतातील जनावरांच्या गोठ्यामध्ये लेंडी नदीचे पाणी शिरून ४० जनावरे गुदमरून मृत्यू तर २० जनावरे वाहून गेले आहेत.

नांदेड जिल्ह्यात पूर्व परिस्थिती सांगताना गावक-यांनी हंबरडा फोडला. याची एक ऑडिओ क्लीप व्हायरल झाली आहे. त्यामधील शब्द ऐकून डोळ्यातून टचकन पाणी येईल. आमच्या गावात एक गडी मेला, चार बाया वाहून गेल्या त्या अजून सापडल्या नाहीत. एकाएकी पाणी आलं, मागचा दरवाजा मोडून लेकराला आणि सुनेला बाहेर काढलं. सामान गेलं दोन लाख रुपये आणून ठेवले होते तेही गेले. साडेचार महिन्याचे लेकरं घेऊन माळाला आलो. पैसा गेला, सोनं गेलं, जीव वाचवा म्हणून माळावर आलो, असे शब्द त्या ऑडिओ क्लीपमध्ये आहेत.

## देशभरातील भ्रमणध्वनी आणि इंटरनेट सेवा विस्कळीत

नवी दिल्ली/मुंबई : देशातील तीन प्रमुख दूरसंचार कंपन्या जीओ, एअरटेल आणि व्हीआय या कंपन्यांचे नेटवर्क सोमवारी दुपारी अचानक डाऊन झाले. यामुळे देशभरातील लाखो वापरकर्त्यांना कॉल करता येत नाही आणि इंटरनेट सेवा देखील बंद पडली आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरू या प्रमुख शहरांसह चंदीगड, अहमदाबाद, गुवाहाटी आणि मदुरई येथेही मोठ्या प्रमाणावर तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत.

सध्याच्या घडीला या समस्येचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. मात्र प्राथमिक माहितीवरून ही तांत्रिक अडचण असल्याचे सांगण्यात येत आहे. एअरटेलने अधिकृतपणे याची कबुली दिली असून त्यांच्या(पूर्वीचे ट्विटर) हँडलवर आम्हाला झालेल्या गैरसोयीबद्दल खेद आहे, आमचा तांत्रिक विभाग सेवा सुरळीत करण्यासाठी काम करत आहे असे म्हटले आहे.

एअरटेलबाबत ३६०० तक्रारी

एअरटेल वापरकर्त्यांना दुपारी साडेतीनच्या सुमारास अडचणी जाणवायला लागल्या. डाऊनडीटेक्टर या आऊटएज ट्रॅकरनुसार, सुमारे ३,६०० वापरकर्त्यांनी तक्रारी नोंदवल्या आहेत. यामध्ये ५१ टक्के लोक कॉल करू शकत नव्हते. ३१ टक्के लोकांना इंटरनेट वापरता येत नव्हते. तर १८ टक्के वापरकर्त्यांच्या मोबाइलवर सिग्नलच नव्हता.

जिओबाबत २०० हून अधिक तक्रारी

जीओच्या बाबतीत, सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सेवा खंडित झाली. डाऊनडिटेक्टरवर २०० हून अधिक तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत.

वोडाफोनबाबत ५० तक्रारी

वोडाफोन-आयडीयाचा प्रभाव तुलनेने कमी होता.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य म्हणजे दाहक अनुभवाचा आविष्कार -शरद गायकवाड





लातूर / प्रतिनिधी :- साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य म्हणजे दाहक अनुभवाचा आविष्कार आहे असे प्रतिपादन प्रा.डॉ. शरद गायकवाड, कोल्हापूर यांनी केले

फकिरा ब्रिगेड या संघटनेच्या वतीने दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात 'अण्णा भाऊ साठे यांचा साहित्य विचार 'या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून गायकवाड बोलत होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय शिंदे हे होते तर प्राचार्य डॉ.माधव गादेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, जि.प.चे माजी समाजकल्याण सभापती संजय दोरवे,श्री.संजय कांबळे, श्री.गोरख शिंदे,संजय सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गायकवाड पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांनी जे पाहिले,अनुभवले त्यालाच शब्दरूप दिले वाटेगाव ते रशिया या प्रवासात त्यांना अनेक व्यक्ती भेटल्या, अनेक कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले, मुंबईत गेल्यावर तिथले बकाल जीवन, झोपडपट्टीत राहणाऱ्या अनेक व्यक्ती अण्णाभाऊंनी पाहिल्या त्यांच्या जीवनात आलेलं दारिद्र्य, दु:ख, भूक,त्यांच जगणं शब्दबद्ध केले.संयुक्त महाराष्ट्राचा लढा तीव्र करण्यात अण्णाभाऊ साठे,अमर शेख आणि गवाणकर यांचे मोठे योगदान राहिले आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री सचिन दाणे यांनी अण्णा भाऊ साठे यांची माहिती मराठी मध्ये उपलब्ध झाली आहे; परंतु सीबीएससी शाळेत, हिंदी भाषेत येणं आवश्यक आहे त्याशिवाय अण्णाभाऊची ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण होणार नाही असे म्हणाले. या प्रसंगी प्राचार्य गादेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप करताना डॉ.संजय शिंदे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांचा साहित्य विचार माणसाला जगण्यासाठी बळ देणारा आहे. अन्यायाविरुद्ध बंड करायला लावणाराआहे.सामान्य माणूस हाच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता.कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक या साहित्य प्रकारातून अण्णाभाऊंनी समाजातले वास्तव मांडले आहे.

या कार्यक्रमासाठी बाबासाहेब जोगदंड, संतोष पटनुरे, अंकुश कसबे, भानुदास कुडके,शरद धबडगे,सुरेकांत धबडगे, सुदर्शन शिंदे, गहिनीनाथ मस्के, ऋषिकेश भडंगे, बापू कसबे, नरसिंह घोडके, भालचंद्र शिंदे,दगडू कांबळे, क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजू कसबे, साहेब आली सौदागर, सुभाष गायकवाड,सत्तार पटेल,अरूण दादा कुलकर्णी, श्रीमती मीनाक्षी लोदगेकर, श्रीमती रूक्मिणी विरूळे, श्रीमती अर्चना शिंदे, प्रज्ञा गायकवाड, श्रीराम चलवाड इ.उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक नारायण कांबळे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र लोदगेकर यांनी तर आभार संजय विरूळे यांनी मानले.

## फिशिंगपासून पासवर्डपर्यंत - विद्याविकास माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षा मार्गदर्शन



लातूर/प्रतिनिधी: आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढत आहे. मोबाईल, संगणक व सोशल मीडिया या माध्यमांमुळे शिक्षणासोबतच दैनंदिन जीवन सुलभ झाले असले तरी त्याचबरोबर सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना डिजिटल जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये सुरक्षित इंटरनेट वापराची सवय निर्माण करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत विद्याविकास माध्यमिक विद्यालय, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर सोप्या आणि उदाहरणासहित मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर कसा करावा, अनोळखी लिंक किंवा फिशिंग मेसेज ओळखण्याचे तंत्र, मजबूत व सुरक्षित पासवर्ड तयार करण्याची पद्धत, ऑनलाइन बँकिंग व डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी, तसेच इंटरनेटवर होणाऱ्या विविध फसवणुकींपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

याशिवाय, सायबर गुन्हा घडल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता तात्काळ तक्रार नोंदवावी यावर विशेष भर देण्यात आला. यासाठी उपलब्ध असलेली हेल्पलाईन क्रमांक १९३० तसेच ऑनलाईन तक्रार पोर्टलचा वापर कसा करावा याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यशाळेस शाळेचे मुख्याध्यापक श्री. जितेंद्र कातपुरे, शिक्षकवृंद श्री. रविंद्र अपसिंगे, श्री. सत्यजित मुंडे, श्री. लालासाहेब शिंदे, श्री. जयराम शिंदे, श्री. गजानन चाटे, श्रीमती शारदा लटपटे, श्रीमती वर्षा केंद्रे व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची भावना जागृत झाली असून ते आता इंटरनेटचा अधिक सावध व सजगतेने वापर करतील, असा विश्वास उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केला. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक माहितीच नव्हे तर डिजिटल जगतात सुरक्षित आणि जबाबदार नागरिक म्हणून वागण्याची प्रेरणाही मिळाली.

# संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष व सदस्यांनी भाजपा नेते आ. कराड यांचा सत्कार करून मानले आभार





लातूर :- रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती जाहीर करण्यात आली असून या समितीवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल भाजपा नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून समितीचे अध्यक्ष आणि सदस्यांनी आभार व्यक्त केले.

भाजपाचे नेते आ. श्री रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंह राजे भोसले साहेब यांनी रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती जाहीर केली असून त्यानुसार मा. जिल्हाधिकारी लातूर यांनी सदरील नियुक्तीचे पत्र नुकतेच संबंधितांना पाठविले आहे.

नव्याने गठीत करण्यात आलेल्या संजय गांधी निराधार योजना समितीत काम करण्याची संधी दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून रेणापूर तालुका समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर आणि लातूर तालुका समितीचे अध्यक्ष बन्सी भिसे यांच्यासह नवनिर्वाचित सदस्य ललिता कांबळे, अनुसया फड, विठ्ठल कस्पटे, विजय चव्हाण, सुरेश बुड्डे आणि लातूर तालुक्यातील रुपेश काळे, श्रीमती श्रुती अविनाश सवई मुरुड, रमेश लहाडे, बाबासाहेब भिसे, राजकुमार सुरवसे चिंचोलीब, विनायक मगर, योगीराज साखरे यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवतराव सोट, नवनाथ भोसले, पद्माकर चिंचोलकर, शरद दरेकर, प्रताप पाटील, सुरज शिंदे, वैभव सापसोड, डॉ. बाबासाहेब घुले, गणेश तुरूप, श्रीकृष्ण जाधव, गणेश वांगे, उत्तम पवार, गोपाळ पाटील, चंद्रकांत कातळे, साहेबराव मुळे, भैरवनाथ पिसाळ, शाम वाघमारे, धनराज शिंदे, अशोक सावंत, हनुमंत गव्हाणे, शिवाजी जाधव, रमेश केंद्रे, राम चव्हाण, प्रताप भुरे, सचिन अडतराव, राजकुमार मानमोडे, संजय डोंगरे, नाथराव गीते, बालासाहेब कदम, शुभम खोसे, बालाजी गवळी, भुजंग काळदाते, ज्ञानेश्वर जुगल, सुरेश सूर्यवंशी, श्रीकांत झाडके, प्रशांत रायनूळे, अविनाश सवई, बालाजी पारडे, ज्ञानेश्वर माचवे, विशाल कणसे, विष्णू केंद्रे, सुधाकर फुले, दत्ता आंबेकर, राम भताने, सुधाकर दहिफळे, आप्पासाहेब पाटील, सुधीर भताने, नंदकुमार नागरगोजे यांच्यासह अनेक जण होते.

## दै. प्रतिव्यवहार चे संपादक प्रभुअप्पा मुनाळे यांचे निधन



लातूर : येथील दैनिक प्रतिव्यवहारचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार प्रभुअप्पा त्रिंबकप्पा मुनाळे (मामा) यांचे सोमवार, दि.१८ ऑगस्ट २०२५ च्या पहाटे अल्पशः आजाराने मोती नगर येथील रहाते घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते.

स्व. प्रभूअप्पा मुनाळे मागच्या काही दिवसांपासून आजारी होते. उपचारादरम्यान सोमवारच्या पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. स्व. प्रभूअप्पा मुनाळे आपल्या निकटवर्तीयात मामा म्हणून ओळखले जात होते. मागील तीन दशकात लातुरात वृत्तपत्र सृष्टीत पदार्पण करू इच्छिणाऱ्यांच्या पाठीशी कायम सहकार्याची भावना ठेवणारे व्यक्तिमत्व म्हणूनही त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या पार्थिवावर येथील सिध्देश्वर स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. प्रभुअप्पा मुनाळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा दिलीप मुनाळे ,एक मुलगी, सुना - नातवंडे असा परिवार आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## शांततेच्या दिशेने...

संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या अमेरिका आणि रशियातील शिखर परिषदेत युक्रेनबाबतच्या शांतता करारावर एकमत झाले नसले, तरीही त्या दिशेने पुढचे पाऊल पडले आहे. २०२२ च्या आरंभी ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असते, तर हे युद्ध सुरू झाले नसते, असे उद्गार काढून रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी अमेरिकेतील विद्यमान प्रशासनासोबत चांगले संबंध प्रस्थापित करू इच्छितो, याचेच संकेत दिले. आता युक्रेनमधील संघर्ष कमी करण्यासाठी ट्रम्प यांची मदत होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. दोन्ही नेत्यांची पुढील बैठक मॉस्कोत होणार असून, त्यावेळी शांततेच्या दिशेने ठोस पाऊल पडण्याची शक्यता आहे.

अलास्का येथे काही बाबींवर मतैक्य झाले. युद्ध संपवण्यासाठी रशिया उत्सुक असून, शांतता प्रस्थापित करण्यासाठी वाटाघाटींना तयार असल्याचे संकेत त्यांनी दिले. मुळात युरोप आणि अमेरिकेने रशियाला 'बहिष्कृत' केले होते; पण पुतीन यांची भेट घेऊन हा बहिष्कार संपवल्याचे अमेरिकेने सूचित केले. हा पुतीन यांचा राजकीय विजय मानला पाहिजे. तसेच युद्धाची मूळ कारणे जाणून घेऊन, नंतरच शांततेचा तोडगा काढला पाहिजे, असेही पुतीन यांनी सुनावले. गेली अनेक वर्षे युक्रेन 'नाटो' संघटनेचे सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. संघटनेलाही नवनवीन राष्ट्रांना सदस्य करून घेऊन विस्तार करायचाय; पण त्यामुळे रशियाच्या सुरक्षेस बाधा येते आणि हा मूळ मुद्दा आहे, असे पुतीन यांनी स्पष्ट केले. तसेच युक्रेनचा जो भूभाग रशियाने पादाक्रांत केला, तो परत देण्याची पुतीन यांची तयारी नाही. त्यामुळे ट्रम्प यांना युक्रेनचीच 'समजूत' काढावी लागेल, असे दिसते. मे महिन्यात अमेरिकेने युक्रेनसोबत खनिजे आणि ऊर्जाविषयक एक करार केला. दोन्ही देश या क्षेत्रात गुंतवणूक करणार असून, त्यामुळे युक्रेनचे आर्थिक पुनर्वसन होईल. तसेच अमेरिकेचाही फायदा होईल.

अमेरिकेला युक्रेनमधील 'रेअर अर्थ' मध्ये रस आहे. त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने त्याचे महत्त्व खूप आहे. रशिया युक्रेनचा काही भूभाग गिळंकृत करू पाहतेय, याच्याशी अमेरिकेला काहीही देणे-घेणे नाही. अमेरिका फायदा बघणार, हे उघड. जून २०२१ मध्ये अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष जो बायडेन आणि पुतीन यांची जिनेव्हा येथे भेट झाली होती. पण, ती अयशस्वी झाली आणि त्यानंतर आठ महिन्यांनी रशियाने युक्रेनवर आक्रमण केले. शुक्रवारी ट्रम्प आणि पुतीन यांची ज्या अलास्का येथे भेट झाली, १८६७ साली हे अलास्का ७२ लाख डॉलर घेऊन रशियाने अमेरिकेला विकले होते. त्यानंतर अलास्काला भेट देणारे पुतीन रशियाचे पहिले अध्यक्ष. २०१५ साली पुतीन यांनी संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत भाग घेण्यासाठी अमेरिकेस भेट दिली होती. या दोन नेत्यांची भेट आतापर्यंत सहावेळा झाली असून, त्यांची शेवटची भेट २८ जून २०१९ रोजी जपानमधील ओसाका येथे झाली.

ट्रम्प यांच्या दुसर्या टर्ममध्ये त्यांनी २४ तासांत रशिया-युक्रेन युद्ध थांबवेन, अशी गर्जना केली होती. सत्तारूढ झाल्यानंतर महिन्याच्या आत ट्रम्प यांनी फोनवर पुतीन यांच्याशी चर्चा केली होती. १८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि रशियाचे ज्येष्ठ अधिकारी रियाध येथे भेटले होते. युद्धसमाप्तीच्या दृष्टीने काय करता येईल, या संदर्भात त्यांच्यात चर्चा झाली. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनमध्ये रणगाडे घुसवल्यानंतर अमेरिका व रशियामध्ये झालेली ही पहिली थेट चर्चा होती. त्यानंतर १० दिवसांतच युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लोदोमीर झेलेन्स्की आणि ट्रम्प व उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांची व्हाईट हाऊस येथे भेट झाली. त्यावेळी ट्रम्प आणि झेलेन्स्की यांची तणातणी झाली. अपमानित झालेले झेलेन्स्की तेथून निघून गेले. त्यामुळे अमेरिकेचे पारडे रशियाकडे झुकले, असे चित्र निर्माण झाले; पण एप्रिलमध्ये ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर, जर्मनीचे चॅन्सेलर फ्रिडरिश मर्झ आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी या प्रश्नात पुढाकार घेतला. त्यानंतर व्हॅटिकन येथे ट्रम्प यांची झेलेन्स्कींसोबत पुन्हा भेट झाली आणि त्यावेळी फलदायी चर्चा झाल्याची प्रतिक्रिया ट्रम्प यांनी दिली.

युक्रेनवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्याचा पुतीन यांना कोणताही अधिकार नाही, असे मत ट्रम्प यांनी व्यक्त केले. गेल्या जुलै महिन्यात पुतीन यांनी निराश केले आहे, असे एका मुलाखतीत ट्रम्प म्हणाले होते. त्यानंतर काही तासांतच युक्रेनला आणखी शस्त्रे पुरवणार आहोत, असे त्यांनी जाहीर केले. ५० दिवसांत रशियाने शस्त्रसंधी न केल्यास, भरमसाट कर लावण्याचा इशारा त्यांनी दिला होता. रशियाला दिलेली मुदत ७ ऑगस्टरोजी संपली असून, आता परिणामांना भोगायला तयार व्हा, असा इशाराही ट्रम्प यांनी दिला होता. गेल्या बुधवारी युरोपियन देशांचे नेते तसेच झेलेन्स्की यांच्याशी ट्रम्प यांनी ऑनलाईन माध्यमातून चर्चा केली. आमच्यातील वाटाघाटी सलोख्याने झाल्या आणि आता युद्धबंदी न केल्यास, रशियाला गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल, असा निर्वाणीचा इशारा ट्रम्प यांनी दिला होता.

जगात ठिकठिकाणी सुरू असलेली युद्धे आणि संघर्ष मी कसा थांबवू शकतो आणि मीच जगाचा नेता आहे, हे ट्रम्प यांना सिद्ध करून दाखवायचेय. आपल्याला नोबेल शांतता पुरस्कार मिळावा, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. रशियाकडून तेल घेणार्या भारतावर अमेरिकेने वाढीव आयातशुल्क लादण्याचे जाहीर केले असले, तरी कदाचित मला तसे करण्याची गरज पडणार नाही, असे उद्गारही ट्रम्प यांनी काढले आहेत. भारताच्या दृष्टीने हे शुभसंकेत मानावे लागतील; मात्र तसे घडले नाही, तरी वाढीव आयात शुल्काविरोधात देश समर्थपणे उभा राहील. स्वदेशीच्या धोरणाद्वारे देश प्रगतिपथावरच असेल, असे ठाम उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून काढले आहेत. त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात काय-काय घडेल, हे पाहावे लागेल.

# राज्यातील कायदा-सुव्यवस्था : नागरिक असुरक्षिततेच्या छायेत

गेल्या काही महिन्यांपासून राज्यात घडणाऱ्या घटनांनी सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कधी हत्तीण, कधी कबूतर, तर कधी मटण या किरकोळ कारणांवरून धार्मिक, जातीय व सामाजिक गटांमध्ये वाद उफाळून हिंसाचाराच्या स्वरूपात रस्त्यावर प्रकट होत आहेत. या हिंसेत निरपराध नागरिक, महिला व तरुणी यांना मारहाण होणे ही गंभीर बाब आहे. समाजातील सौहार्द डळमळीत होत असून नागरिकांना आपण सुरक्षित आहोत का? हा प्रश्न सतावतो आहे.

अंमली पदार्थ व शस्त्रास्त्र तस्करीची सातत्याने वाढ होत आहे. तसेच राज्यात अमली पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असल्याची प्रकरणे उघड होत आहेत. लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्या व खासगी वाहनांतून या तस्करीचे जाळे पसरले आहे. गेल्या काही वर्षांत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज जप्त केले असले तरी त्याच्या मुळावर घाव घालण्यात प्रशासन कमी पडत असल्याचे दिसते. यात आणखी एक चिंतेची बाब म्हणजे परप्रांतीय लोकांच्या माध्यमातून वाढणारी शस्त्रास्त्र तस्करी. यामुळे गुन्हेगारी टोळ्या अधिक बळकट होत आहेत आणि समाजातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत आहे.

नागरिकांसाठी दिवसेंदिवस समस्या वाढतच आहेत. कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत असताना नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही इतर अनेक समस्या कोसळत आहेत. रस्त्यांची दुरवस्था इतकी बिकट झाली आहे की अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सुविधा अपुऱ्या आहेत, औषधांचा तुटवडा भासत आहे. सामान्य नागरिकांना मूलभूत हक्कांसाठी देखील संघर्ष करावा लागत आहे. समाजातील सौहार्द टिकवणे, नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे व गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे ही गृहखात्याची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र सध्या या सर्व आघाड्यांवर शासन अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. सतत घडणाऱ्या घटनांमुळे सरकारच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे. जसे, हिंसा आणि तस्करी रोखण्यासाठी स्थानिक स्तरावर माहिती गोळा करून तातडीने कारवाई करणे गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट करणे गरजेचे आहे. पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञान, उपकरणे व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून पोलिस दलाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. ड्रग्ज व शस्त्रास्त्रांवर कठोर नियंत्रण ठेवण्याकरीता वाहतूक मार्गांवर नाकाबंदी, तपासणी मोहिम व कठोर शिक्षा यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. सामाजिक सामंजस्य मोहिम, धार्मिक व जातीय मतभेद टाळण्यासाठी संवाद, जनजागृती व शांती समित्या सक्रिय करणे आणि शेवटी रस्ते व आरोग्य सेवांमध्ये गुंतवणूक केल्यास नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यास असंतोष कमी होईल.

राज्यातील वाढत्या घटना शासनाच्या अपयशाकडेच बोट दाखवत आहेत. सामान्य नागरिक सुरक्षिततेची अपेक्षा करतो, पण त्याऐवजी तोच हिंसा व अराजकतेचा बळी ठरत आहे. त्यामुळे आज गृहखात्याने तातडीने जागे होऊन ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्याचे सामाजिक व राजकीय परिणाम गंभीर असतील.

**********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# तालिबानची चार वर्षे : भवितव्य अनिश्चितच!



५ ऑगस्ट २०२१ रोजी अफगाणिस्तानची राजधानी काबूलवर कोणताही प्रतिकार न होता तालिबानने ताबा मिळवला. या घटनेला शुक्रवारी चार वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या दिवशी काबूलच्या रस्त्यांवर भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण होते. हजारो नागरिक देश सोडून पळून जाण्यासाठी विमानतळावर गर्दी करत होते. अमेरिकेच्या लष्करी विमानाच्या चाकांना लटकून जीवघेणा प्रवास करणार्या लोकांची दृश्ये आजही जगाच्या स्मरणात आहेत. तत्कालीन राष्ट्राध्यक्ष अशरफ घनी हेलिकॉप्टरमधून देशाबाहेर परागंदा झाले होते; तर दुसरीकडे २० वर्षे तालिबानशी लढणारे अमेरिका सैन्य आणि नागरिकांना बाहेर काढण्याच्या घाईत होते. या चार वर्षांत अफगाणिस्तान पूर्णपणे बदलला आहे. तालिबानने आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला असला, तरी देशांतर्गत परिस्थिती, विशेषतः महिलांच्या अधिकारांबाबत, गंभीर बनली आहे.

तालिबानची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाल्यानंतर सर्वात वेदनादायी परिणाम अफगाण महिलांना भोगावा लागला आहे. तालिबानने सत्तेत येताच मुलींच्या आणि महिलांच्या शिक्षणावर बंदी घातली, त्यांना नोकरी करण्यापासून रोखले आणि घराच्या चार भिंतीत बंदिस्त केले. एका अहवालानुसार, अफगाणिस्तानमध्ये सध्या जगातील सर्वात गंभीर महिला अधिकार संकट आहे. यूएन विमेन आणि केअर इंटरनॅशनल ऑगस्ट २०२५ च्या अहवालानुसार, सप्टेंबर २०२३ पासून आतापर्यंत इराण आणि पाकिस्तानमधून २४.३ लाखांपेक्षा जास्त अफगाण शरणार्थी परतले आहेत. यापैकी सुमारे एक तृतीयांश (सुमारे ८ लाख) महिला आणि मुली आहेत. या महिलांना गरिबी, बालविवाह, हिंसाचार, शोषण आणि निर्बंधांचा सामना करावा लागत आहे.

२०२१ मध्ये जेव्हा तालिबानने काबूलवर ताबा मिळवला, तेव्हा पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान यांनी 'अफगाण जनतेने गुलामगिरीच्या बेड्या तोडल्या, असे म्हटले होते. मात्र, या चार वर्षांत परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आता पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर तालिबानला तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) या दहशतवादी संघटनेवर कारवाई करण्याची विनंती करत आहेत. मात्र, तालिबानने टीटीपी हा पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न असल्याचे सांगत, हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. तालिबानने आपल्या मागील राजवटीच्या (१९९६-२००१) तुलनेत या वेळी रणनीतीत मोठे बदल केले आहेत. तालिबान २.० ची धोरणे तालिबान १.० प्रमाणेच दडपशाहीची आहेत; पण त्यांची जनसंपर्क रणनीती आणि प्रादेशिक मुत्सद्देगिरीत मोठा बदल झाला आहे. तरीही, मूळ विचारधारा सोडलेली नाही. यामुळे अफगाणिस्तानचे भवितव्य आजही तितकेच अनिश्चित आणि आव्हानात्मक आहे, जितके ते चार वर्षांपूर्वी होते.

# कल्याणकारी राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने..!

भारतीय स्वातंत्र्याचा आज ७९ वा वर्धापन दिन. भारतीय प्रजासत्ताक अधिक बलशाली व्हावे आणि भारत जगातील कोणत्याही प्रजासत्ताक देशाच्या एक पाऊल पुढेच असावा, या दृष्टीने केल्या जाणार्या प्रयत्नात समग्र लोकसहभाग महत्त्वाचा आहे. अधिकाधिक लोकांच्या कल्याणाचा विचार करणार्या भारताला नजीकच्या भविष्यात अधिकाधिक कामे पूर्ण करता यावीत म्हणून महात्मा गांधी यांनी 'हिंद स्वराज्य' या ग्रंथात असे म्हटले होते की, माझा लोकशाही भारत तो असेल, ज्यात गरिबातील गरीब व्यक्तीला बलशाली माणसासारखी समान संधी मिळू शकेल.

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

बलसागर भारत होवो, असे स्वप्न पाहणार्या स्वातंत्र्यलढ्यातील हजारोंच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने आज सामर्थ्यशाली भारत वाटचाल करत आहे. ज्या इंग्रजांनी 'जहाँ डाल डाल पर सोने की चिडियाँ करती थी बसेरा' असे म्हटल्या जाणार्या भारताची लूट केली, त्या ग्रेट ब्रिटनला मागे टाकून भारत जगातील चौथी अर्थव्यवस्था बनला असून, तिसर्या स्थानाकडे झेपावतोय. याच ब्रिटनला भारतासोबत मुक्त व्यापार करार करण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली, हे भारताचे बलस्थान आहे. भारत-ब्रिटन यांच्यातील हा करारही यंदाच्या स्वातंत्र्य दिनापूर्वी पूर्णत्वाला गेला. आज भारतीय प्रजासत्ताक अनेक संक्रमणावस्थेतून यशस्वीपणे पुढे जात आहे.

शतक महोत्सवाकडे निघालेली भारतीय लोकशाही बळकट करणे आणि लोकांच्या आशाआकांक्षा आपल्या राजकीय व्यवस्थेत प्रतिबिंबित करणे हे वर्तमानातील सर्वात मोठे आव्हान आहे. शेती, उद्योग, शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत देशाने स्वातंत्र्योत्तर काळात विलक्षण गतीने प्रगती केली आहे. भविष्यातही भारताला जगातील बलशाली राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीने प्रजासत्ताकाची वाटचाल फलदायी ठरणार आहे. भारतीय संविधानाच्या प्रीॲम्बलमध्येच 'आम्ही भारतीय लोक स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय याच्या प्रस्थापनेसाठी वचनबद्ध आहोत,' असे नमूद करण्यात आले आहे. भारत हे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

सबंध जगाच्या व्यवस्थेत प्रजासत्ताकाद्वारे जनतेचे कल्याण कसे व्हावे, या दृष्टीने काही विचार मांडण्यात आले. लॉर्ड व्हाईस यांनी लिहिलेल्या 'मॉडर्न डेमोक्रसी' या ग्रंथात असे म्हटले होते की, लोकशाही म्हणजे मूठभर लोकांचे राज्य नसून, ते अधिकाधिक लोकांच्या इच्छेनुरूप चालणारे राज्य आहे. अब्राहम लिंकन यांनी, 'लोकांकडून लोकांसाठी लोकांकरिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही,' अशी कल्पना मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, 'जिथे परिवर्तन बंदुकीने नव्हे, तर मतपेटीने होते ती खरी लोकशाही होय,' असे म्हटले आहे.

स्वातंत्र्याला खरा अर्थ लाभण्यासाठी लोकांच्या आशाआकांक्षा सफल करण्याला फार महत्त्व आहे. आपल्या राज्यघटनेतील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल ऑफ स्टेट पॉलिसीमध्ये भारत हे कल्याणकारी राज्य म्हणून नमूद केले आहे. त्यात विकासाचे काही मुद्देही दिले आहेत. हे मुद्दे भविष्यातील आमच्या स्वप्नांची जणू नोंद आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात विविध आघाड्यांवर केलेली प्रगती पाहता, आपण मजबूत आणि सामर्थ्यशाली राष्ट्र बनलो आहोत, यात काही शंका नाही. तरीही देशापुढे असलेली काही आव्हाने आणि अडचणींचा मागोवा आपण घेतला पाहिजे.



त्यामुळे भविष्यातील आपली वाटचाल अधिक सुलभ आणि सुकर होऊ शकते.

भारतासारख्या देशात कृषी, उद्योग, शिक्षण ही महत्त्वाची शाश्वत विकासाची क्षेत्रे आहेत. तेव्हा या क्षेत्रांत आपणास प्रकल्प रचताना पर्यावरणाचा विनाश न होता विकास कसा साध्य होईल यावर भर द्यावा लागेल, पर्यावरणानुकूल जीवनशैली विकसित करावी लागेल आणि आपल्या देशातील साधनसामग्रीचा उपयोग पर्याप्त आणि नियोजितपणे केला पाहिजे. साधनसामग्री वाया न जाता पर्यावरणाचे संरक्षणही केले पाहिजे. जगातील १२ देशांपैकी भारत एक असून, जैवविविधतेचे रक्षण करण्याची मोठी योजना आखली आहे. या योजनेचे आपण सर्वांनी पालन करून वृक्षारोपणाचे प्रकल्प यशस्वी करून ऊर्जा, तसेच जमीन, पाणी या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर काटकसरीने केला पाहिजे की, भविष्यात भावी पिढीपुढे या प्रकारचे प्रश्नच उद्भवणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागेल. शाश्वत विकासाचे साधन म्हणून शेती उद्योगाप्रमाणेच शिक्षणालाही महत्त्व आहे.

आपल्या शेतीचे आधुनिकीकरण करताना जमिनीचा पोत कसा टिकून राहील, याकडे लक्ष दिले पाहिजे. दुर्दैवाने आज असे होते की, खते, रसायनांचा इतका मोठ्या प्रमाणावर वापर सुरू आहे की, त्यामुळे जमिनीचा पोत नष्ट होतो आहे. अतिपाण्यामुळे खारफुटीचा धोका निर्माण होत आहे. तेव्हा शेतजमिनीचे आधुनिकीकरण करताना शेतीमध्येही आमलाग्र सुधारणा कराव्या लागतील. पारंपरिक शेती आणि आधुनिक शेती पद्धती यामध्ये समन्वय साधावा लागेल.

उद्योग क्षेत्रात आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'स्टार्टअप'सारखे प्रकल्प हाती घेऊन आपण 'आत्मनिर्भर भारत'च्या दिशेने प्रवास करत आहोत. येणार्या काळात उद्योग क्षेत्रात काही नवे करण्याचे संकल्प केले आहेत. उद्योग धंद्याच्या क्षेत्रात एकाहून एक दमदार पावले पुढे टाकावी लागतील आणि भारतात निर्माण झालेल्या वस्तू या दर्जेदार आहेत, हे जागतिक पटलावर नव्याने सिद्ध करावे लागेल. जागतिक बदलांचा आणि अमेरिकन संकटाचा विचार करता, गुणवत्तापूर्ण उत्पादने हेच उद्योगाचे महत्त्वाचे लक्षण असले पाहिजे. कॉर्पोरेट उद्योग क्षेत्रात भारताने एक मोठी गरुडझेप घेतली आहे. ती तेवढ्यावरच न थांबता ती त्याच गतीने भविष्यातही पुढे गेली पाहिजे. मागील तीन दशकांत चीनसारख्या देशाने आपल्या देशाची बाजारपेठ कधी कब्जात घेतली, हे आम्हाला कळले नाही.

आता ते आपल्याशी व्यापार युद्ध करताहेत, हे लक्षात घेऊन परकीय वस्तू न वापरता स्वदेशी वस्तूंच्या वापरावर भर दिला तरच आपण जगाच्या अर्थव्यवस्थेत टिकू शकतो; पण असे करताना केवळ एकांगी वागून चालणार नाही, तर जगाच्या बाजारपेठेतून येणारी भांडवली व्यवस्था वापरून त्याद्वारे आपले उद्योग निर्माण करावे लागतील. उद्योगामध्ये वस्तू व सेवांची गुणवत्ता जागतिक पातळीवर उंचावणे जसे महत्त्वाचे आहे, तसे शेतीमध्येसुद्धा जमिनीचा पोत कसा ठेवता येईल, उत्पादकता कशी वाढवता येईल. सेंद्रिय शेतीद्वारे नवे प्रयोग कसे करता येतील, यावर भर दिला पाहिजे.

शिक्षण हा प्रगतीचा पाया आहे, आधार आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षणाच्या क्षेत्रात आमूलाग्र सुधारणांचे पर्व आणले आहे. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक तरतूदही तितकी भक्कम करणे आवश्यक आहे.

# लातूर – नांदेड महामार्गावरील गरुड चौक अपघात प्रणव क्षेत्र तोच महामार्ग, तीच जागा, थरार उडवणारा भयावह अपघात.

## गरुड चौकातील झालेल्या भीषण अपघातात बस्वराज स्वामी याचा उपचारा दरम्यान मृत्यू .

लातूर :-- लातूर शहरातून जाणारा लातूर – नांदेड ३६१ राज्य महामार्ग विकास कामांच्या चुकांमुळे गरुड चौकात रोज होत असलेल्या जीवघेण्या अपघातावर नियंत्रणाकरिता राज्य महामार्ग कार्यालय नांदेड, महानगरपालिका लातूर, पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर यांच्या मार्फत उपाय योजना करावे म्हणून लातूर शहर पूर्वभाग नागरी हक्क कृती समितीने लोकशाही मार्गाने सन २०23 पासून आज पर्यंत अनेक निवेदने देवूनही अद्याप सकारात्मक प्रतिसाद नाही (स्वातंत्र्यदिनी) १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते ११ च्या दरम्यान गवळीनगर भागातील बसवराज स्वामी वय ४० वर्षे हे गरुड चौकातून रस्ता ओलांडताना भरधाव येणारी ट्रक टि एस १५ यु सी ९४४४ क्रमांकाची वाहन गरुड चौकातून बाभळगाव नाक्याकडे जाणारी ट्रक वळण घेत असताना चालत जाणारे बस्वराज स्वामी या व्यक्तीला धक्का लागल्याने ते खाली पडून त्यांचे मागील चाकाखाली पाय गेल्याने तो जखमी झाले त्यांचा शासकीय हॉस्पिटल मध्ये उपचार घेत असताना मृत्यू झाल्याने आज पूर्वभाग समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले.

:-- लातूर शहरात गरुड चौकातून लातूर नांदेड राष्ट्रीय महामार्ग ३६१ नागपूर रत्नागिरी हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग कार्यालय नांदेड यांच्या कडून विकसित करण्यात आला या विकास कामात गरुड चौक ते कृषी महाविद्यालय मार्गावर सर्व्हिस रोड नाही, गरुड चौकात तिन्ही बाजूने जास्तीचा दुभाजक बांधण्यात आल्याने चौक लहान झाला, मध्यभागी छोटेशे वर्तुळ आवश्यक असतांना ते मोठे बांधून वाहतुकीस समस्या निर्माण झाल्याने लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या सतत



च्या पाठपुराव्याने छोटे गोल वर्तुळ पुन्हा बांधण्याच्या अटीवर काढण्यात आले, गरुड चौकात वेग मर्यादा करिता गतिरोधक नाहीत शिवाय महादेव नगर, करीम नगर , माऊली नगर भागातील नागरिकांना रहदारी करिता जवळच्या परंडेकर पेट्रोल पंप समोर दुभाजकातुन मार्ग सोडण्यात न आल्याने या भागातील नागरिकांना नाईलाजानेचूकीच्या दिशेने वाहतूक करावी लागत असल्याने अपघातांची समस्या निर्माण होत आहे. गरुड चौक ते राजीव गांधी मार्गावरील सर्व्हिस रोडवर गॅरेज लाईन व्यवसायीक सर्व्हिस रोडवर वाहने उभी करून कामे करीत असल्याने रींग रोड लगतच्या नागरिकांना राहदरीस सर्व्हिस रोड सोडून मुख्य रस्त्यावर जीव मुठीत धरून रहदारी करावी लागते या अपघातांवर नियंत्रण करण्याकरता पूर्व भाग समितीने पुढील मागण्या केल्या आहेत.

–द्धमहानगरपालिकेने सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण तात्काळ काढावे, द्ध गरुड चौकात पोलीस मदत केंद्राची स्थापना करावी, द्धसर्विस रोड सह दुभाजकातून मार्ग मोकळा करावा, द्धगरुड चौकाच्या तिन्ही बाजूंनी जास्तीचे दुभाजक कमी करावे द्ध गरुड चौक, सारोळा चौकात गतिरोधकबसवावे, द्धगरुड चौकात मध्य भागात छोटा गोल वर्तुळ बांधून वायू प्रदूषण नियंत्रण ठेवण्यासाठी कारंजे बसवण्यात यावेत, द्ध लातूर शहर महानगरपालिकेने गरुड चौक ते राजीव गांधी चौक मार्गावरील सर्व्हिस रोडवरील अतिक्रमणमुक्तीसह गरुड चौकात पोलीस मदत केंद्रास जागा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना मा जिल्हाधिकारी यांनी कराव्यात,द्ध मा.पोलीस अधीक्षकांनी गरुड चौकात पोलीस मदत केंद्र करून गरुड चौकात कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नियुक्त मागणी करण्यात आली , गरुड चौक महामार्ग मृत्यूचा सापळा झाला आहे. या महामार्गावर एकाच ठिकाणी सलग तिसरा अपघात झाला. या अपघातामध्ये एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला. दिनांक १५ ऑगस्ट च्या अपघाताचा थरारक व्हिडीओ सोशल मीडियातून सद्य खूप मोठा चर्चेचा विषय बनला आहे. राज्य महामार्गांवर होणारे अपघात हे एक गंभीर समस्या बनले आहे. लातूर–नांदेड महामार्गावर एकाच ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत. अतिवेगाने वाहन चालवणे, धोकादायक वळणे, आणि रस्त्यांची दुरावस्था यांसारख्या कारणांमुळे सतत अपघात होत असल्याने लातूर शहर पूर्वभाग नागरी हक्क कृती समितीने जिल्हाधिकाऱ्यांसह , पोलीस अधीक्षक, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त यांना आज निवेदन देण्यात आले निवेदनावर लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, अमोल गायकवाड, सुरेश संगापुडे, धीरज कश्यप ,डी उमाकांत, भगवेश्वर धनगर ,इत्यादी च्या स्वाक्षऱ्या आहेत

## जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या ०६ स्वंयसहाय्यता बचत गटांना मिळणार मिनी ट्रॅक्टर

लातूर, दि. १८: अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंयसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवठा करण्यात येतो. या योजनेसाठी सन २०२४–२०२५ आर्थिक वर्षातील पात्र बचत गटाची निवड करण्यासाठी १४ ऑगस्ट, २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे लॉटरी सोडतचे (ड्रॉ) आयोजन करण्यात आले होते. यावेळी छाननी अंती पात्र ठरलेल्या ३२ अर्जांमधून ६ बचत गटांची निवड करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वंयसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने योजनेसाठी सन २०२४–२०२५ या वर्षात ३५ अर्ज प्राप्त झालेले होते. या अर्जाच्या छाननी अंती ३२ अर्ज पात्र ठरले. शासनामार्फत या योजनेसाठी ०६ इतके उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यानुसार पात्र बचत गटांमधून ६ बचत गटांची लॉटरी सोडत (ड्रॉ) पध्दतीने निवड करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेस समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त कार्यालयाचे समाज कल्याण अधिकारी विलास केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर सहाय्यक लेखाधिकारी राजेश सुरकुटलावार, समाज कल्याण निरीक्षक के. टी. मोरे, वरिष्ठ लिपीक डी. के. शिरबतळ, वाय.बी. कावाले, कनिष्ठ लिपीक टी.डी. बायेणे यांनी विशेष परिश्रम घेतले. या योजनेतंर्गत निवड झालेल्या लाभार्थी बचत गटांनी आवश्यक कागदपत्रे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास सादर करण्याचे आवाहल समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत विविध बाबींसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर :– राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळीतधान्य) सन २०२५–२०२६ अंतर्गत फ्लेक्झी घटक या घटकांतर्गत गोदाम बांधकाम, काढणी पश्चात पायाभूत सुविधा या बाबींसाठी तालुकास्तरावर अर्ज मागविण्यात येत आहेत. शेतकरी उत्पादक संघ अथवा कंपनी, एफपीओ, एफपीसी यांनी त्या त्या पात्र असणाऱ्या बाबीसाठी तालुकास्तरवार ऑफलाईन पध्दतीने २९ ऑगस्ट, २०२५ पर्यंत अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क करावा, असे जिल्हा अधीक्षक कृषिअधिकारी एस. व्ही. लाडके यांनी कळविले आहे. गोदाम बांधकाम या बाबी अंतर्गत अन्नधान्य साठवणुकीसाठी २५० मे. टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा १२ लाख ५० हजार रुपये यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान देय राहील. ही बाब बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जादार शेतकरी उत्पादक संघ, कंपनी, एफपीओ, एफपीसी यांनी केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना तथा नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रकल्प सादर करणे आवश्यक आहे. काढणी पश्चात पायाभूत सुविधा या बाबी अंतर्गत तेलबिया संकलन, तेल काढणे आणि तेल उत्पादन कार्यक्षमता वाढविण्यासाठी तेल काढणी युनिट (१० टन क्षमता) आणि तेलबियांवर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रसामुग्री आणि उपकरणे, तेलबिया प्रक्रिया युनिट (सोयाबीन व दुय्यम तेलबिया) यासाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के कमाल किंवा ९ लाख ९० हजार रुपये यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. लाडके यांनी कळविले आहे.

## संततधार पडणाऱ्या पावसामुळे पिकबाधित शेतक–यांना पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी–वसुदेव गायकवाड

केज/प्रतिनिधी गेल्या चार दिवसापासून संततधार पडणाऱ्या पापसामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झालेले आहे, हाता – तोंडाशी आलेला घास पाण्यात गेला आहे, आधिच जबाजारी असलेला शेतकरी अधिक नागवला गेला आहे.



त्यामुळे सततधार पावसामुळे पिके गेलेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचा पंचनामा करून नुकसानीचा मोबदला शासनाने शेतकर्यांना द्यावा व बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रात ओला दुष्काळ शासनाने जादहिर करावा अशी मागणी शासनाकडे जेष्ठ समाजसेवक वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी केली आहे. शेतकरी संकटात आहे, त्याला मदतीची गरज आहे, तेव्हा राज्य शासनाने शेतक–यांवर ओढवलेले संकट लक्षात घेवून ओला दुष्काळ जाहिर करावा अशी मागणी शासनाकडे वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केली आहे.

## डॉ.बाबासाहेबांनी धम्माचा बोधी वृक्ष लावला त्याचे जतन करण्याची जवाबदारी आपल्या सर्वांची आहे.. भंते उपगुप्त महाथेरो

लातूर :– विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सर्वांसाठी धम्माचा महान असा बोधी वृक्ष लावला आहे. त्या बोधी वृक्षाला खत पाणी घालून त्याला वाढवणे त्याचा प्रचार,प्रसार करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.असे प्रतिपादन भंते उपगुप्त महाथेरो यांनी केले. ते लातुर जिल्ह्यातील ऐतिहासिक बुद्ध लेणी परिसर खरोसा येथील श्रावस्ती बुद्ध विहारावर भंते सुमेधजी नागसेन यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षावास महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी थायलंड, कम्बोडीयां, व्हिएतनाम येथील अनेक भंतेगण उपस्थित होते. यावेळी देशाबाहेरील भंतेगण भारतात का आले व त्यांना आपल्या देशात कोणी आणले आहे. याबदलची माहीती देण्यात आली. यावेळी



बोलताना ते पुढे म्हणाले की,भंते सुमेधजी नागसेन यांनी या भागात धम्माची प्रगती केलेली आहे. पण त्यांना आपण सर्वांनी तन– मन आणि धनाने दान केले पाहिजे आपण दान केले तरच हे सर्व मंगल कार्य पार पडणार आहे.धम्माचे काम करत असताना आपण उच्च शिक्षण घेऊन आपले कल्याण करुन घेणे गरजेचे आहे.आता शिक्षणही येथील मनुवादी शासन व्यवस्थेनी महाग केलेले आहे.अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी उपस्थित भिक्खु संघांचीही धम्म देसना संपन्न झाली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भंते सुमेधजी नागसेन आणि डि. के. सुर्यवंशी यांनी केले.यावेळे माजी खासदार डॉ.सुनिल गायकवाड, श्रीशैल्य उटगे,ज्येष्ठ विधिज्ञ जगदिश (दादा) सुर्यवंशी,यांच्यासह लातुर,निलंगा,उमरगा,औसा तालुक्यातील शेकडो उपासक, उपासिका मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला ०७ लाख ६० हजार रुपयाच्या सोन्याचे दागिने व वाहनासह अटक. ०३ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :– घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला ०७ लाख ६० हजार रुपयाच्या सोन्याचे दागिने व वाहनासह अटक. ०३ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.*

याबाबत थोडक्यात माहिती की, काही दिवसा पासून जिल्ह्यात रात्रीच्या वेळी घराचे कडीकोंडा तोडून आतमध्ये प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिने चोरीच्या घटना घडल्या होत्या. त्यावरून विविध पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात होते.



पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना सदरच्या पथकाला रात्रीच्या वेळी कडीकोंडा तोडून घरामध्ये प्रवेश करून सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक १४ ऑगस्ट रोजी दुपारी पथकाने लातूर मधील छत्रपती चौक, औसा रोड परिसरातून एकाला चार चाकी वाहनासह ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांने त्यांचे नाव

१) अविनाश दिलीप भोसले, वय २४ वर्ष राहणार पाटोदा, जिल्हा धाराशिव.

असे असल्याचे सांगितले.

त्याच्या शिफ्ट कंपनीच्या कारमधून त्याने व त्याच्या इतर साथीदारांनी मिळून विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी घराचे कडीकोंडे तोडून घरामधील सोन्या–चांदीचे दागिने चोरल्याचे कबूल करून त्याने त्याच्या इतर साथीदारासह चोरी करून त्याचे हिश्याला आलेले ४० ग्रॅम सोन्याचे दागिने नमूद आरोपीकडून हस्तगत करण्यात आले असून चोरीच्या गुन्ह्यातून मिळालेल्या पैशाने खरेदी केलेली एक चार चाकी व दुचाकी वाहन सुद्धा हस्तगत करण्यात आली असून नमूद आरोपीने त्याच्या इतर साथीदारसह मिळून केलेले चोरीच्या पोलीस ठाणे भादा ,निलंगा,कासार शिरशी येथील प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आला आहे. नमूद गुन्हेगार हा धाराशिव जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असून सध्या तो पोलीस कोठडीमध्ये आहे. त्याच्याकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून त्याच्या सोबतच्या साथीदारांचा शोध पोलिस पथक घेत आहे.

आरोपीने चोरलेल्या मुद्देमालासह ताब्यात घेऊन पुढील कारवाई करिता भादा पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, मोहन सुरवसे, तुराब पठाण, राजेश कंचे, गणेश साठे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, गोरोबा इंगोले, प्रज्वल कलमे, श्रीनिवास जांभळे केली आहे.

## आंबेडकरी मिशनच्या कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या सामाजिक न्यायच्या लढाईत सहभागी व्हावे – राजेंद्र पाल गौतम राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग यांचे प्रतिपादन

नागपूर – विदर्भ हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला राहिलेला आहे. आंबेडकरी मिशनचे नागपूर दिक्षाभूमी हे उगमस्थान आहे. म्हणून विदर्भात असलेल्या आंबेडकरी मिशनच्या कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या सामाजिक न्यायाच्या लढ्यात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन करतांना देशातील तमाम उपेक्षित, वंचित, ओबीसी, दलित व आदिवासी जनतेचा लढा केवळ राहुल गांधीच लढत आहेत, असे प्रतिपादन राजेंद्र पाल गौतम राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग यांनी केले. ते नागपूर येथे कार्यकर्त्यांशी बोलत होते. यावेळी मंचावरती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ जी हत्ती आंबेरे अनुसूचित जाती विभाग, बैठकीचे मुख्य संयोजक तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश लाडे, आमदार संजय मेश्राम, राष्ट्रीय समन्वयक राजेंद्र कळवाडे, अनिल नगराचे इत्यादींची उपस्थिती होती. यावेळी कार्यकर्त्यांशी बोलताना राजेंद्र पाल गौतम सर यांनी सम्राट अशोकाचा भारत ते बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर व आंबेडकर मिशन पर्यंतचा सर्व इतिहास उलगडला. मी सत्तेसाठी किंवा पदासाठी राजकारणात नसून आंबेडकरी



चळवळ व बहुजन समाजाचे आंदोलन यासाठीच माझे समर्पण आहे आणि याकरिता कुठल्याही त्यागाची माझी तयारी आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी तसेच काँग्रेस पक्षामध्ये आंबेडकराईट कार्यकर्त्यांना सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे त्यांचे प्रश्न काँग्रेस पक्षाने लावून धरले पाहिजेत यासाठी आपण सतत राहुल गांधीजी व राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे साहेब यांच्यासोबत चर्चा करत आहोत काम करत आहोत. देशात अनुसूचित जाती व बहुजन समाजाचे प्रश्न असंख्य उभे आहेत वोट चोरीच्या प्रश्नापासून भाजप वरती त्यांनी तिखट शब्दांमध्ये टीका केली. सामाजिक न्यायाचा लढा लढताना त्यांनी इंदिरा गांधी जी यांनी केलेल्या कार्यावरती प्रकाश टाकला.

## सुर्यकांत जाधव यांना विभागीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार प्रदान

लातूर :– आलमता,ता.औसा येथील विवेकानंद वाचनालयाचे ग्रंथपाल सुर्यकांत कमलाकर जाधव यांना सहचारिणी संगीता जाधव यांच्यासमवेत सन २०२३–२०२४ चा महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालयाचा छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ट ग्रंथालय सेवक(ग्रंथमित्र) पुरस्कार प्रदान रविवार,दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईच्या एसएनडीटी महिला मुक्त विद्यापीठ सभागृहात विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोरे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्याध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार,उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी,उपसचिव अमोल मुत्याल,ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.२५ हजार रुपये,स्मृतीचिन्ह,सन्मानपत्र,ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.



सदरील कार्यक्रमाला राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,राज्य कोषाध्यक्ष भीमराव पाटील,राज्य कार्योपाध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,जिल्हाध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर,लिपिक हिरालाल पाटील,नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सुर्यवंशी,बाळासाहेब देवणे,जिल्हा ग्रंथालय संघ संचालक किरण बाबळसूरे, अनिल पाटील,गुरुपद सावळगे,शिवाजी मुळे,विवेकानंद वाचनालयाचे उपाध्यक्ष विश्वनाथ बिराजदार,दिलीप पाटील,मोहंमद शरीफ फाजल,रमाकांत देशपांडे, शिवरुद्रअप्पा धाराशिवे, दत्तात्रय कलूरे,एकनाथ कुंभार, ग्रंथालय विकास परिषदेचे विद्यासागर हणमंते, ग्रंथमित्र संतोष करमले,प्राचार्य मुळे,गिरीधर जंगाले,विद्याधर गायकवाड,होनमाडे, ग्रंथमित्र श्रीधर स्वामी,महादेव खिचडे,भीमराव पाटील,पवन गिरवलकर तसेच ग्रंथालय अधिकारी ,कर्मचारी, ग्रंथालय कार्यकर्ते,ग्रंथालय कर्मचार्यांची उपस्थिती होती. याप्रसंगी मार्गदर्शन करताना,ग्रंथमित्र पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करुन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे ४० टक्के अनुदान वाढ,वर्ग बदल,नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात शासन स्तरावर सुरु असलेल्या कारवाईची माहिती देत वाचकांना अधिकाधिक चांगले साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रंथालय चळवळीतील सर्वांनी प्रयत्न करावे असे आवाहन केले.

## व्ही एस पँथर्स चा कुरेशी समाजाच्या आंदोलनास जाहीर पाठींबा



लातूर : येथील व्ही एस पँथर्स चे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार कुरेशी समाजाने विविध मागण्यांसाठी मूक मोर्चा आयोजित करण्यात आला होता . या मागण्यांचा शासनाने सकारात्मक विचार करून कुरेशी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला . यावेळी जिल्हा अध्यक्ष शरद किणीकर ,संपर्क प्रमुख आनंद जाधव , ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे, ऑटो युनियन शहराध्यक्ष शाहरुख मणियार सह आदीजन उपस्थित होते .

# सुमेध बप्पा शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व रुग्णांना फळाचे वाटप लवकरच सुमेध बप्पा शिंदे यांच्या नावाच्या चौकाचे सुशोभीकरण करणार-हारुणभाई इनामदार

काल. सुमेध बप्पा शिंदे हा आमचा सच्चा कार्यकर्ता व सैनिक होता. सुमेध बप्पांनी आठरा पगड जातीतील सर्व समाजबांधवा सोबत नाळ जोडली होती तळागळतील गोरगरीब नागरिक व युवका सोबत त्यांचे मैत्रीचे संबंध होते बप्पा हा गोरगरिबा, दीनदलितांच्या हाकेला ओ देऊन धावून जात होता व त्यांची विविध ठिकाणची कामे करत होता. सुमेध बप्पा आमच्या कार्यकर्ता व मावळे पेक्षा आमच्या मोठ्या मुला समान होता. तो कोणासमोर झुकला नाही व विकला गेला नाही बप्पा हा स्वाभिमानी बाण्याचा स्वाभिमानी कार्यकर्ता होता म्हणूनच तो उंच शिखरापर्यंत भरावी घेऊन गेला होता.

आज बप्पाच्या जाण्याने आमच्यावर, त्यांच्या कुटुंबावर, आणि मित्र परिवारावर व समाजावर मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जोपर्यंत आमचे आयुष्य आहे तोपर्यंत बप्पाचे जाण्याचे दुःख हे कायम आमच्या हृदयात आहे. बप्पांनी लोकांना दिलेला शब्द करण्यासाठी व त्यांच्या कुटुंबासाठी सदैव तत्पर आहोत बप्पाचे स्वप्न एकही आम्ही अधुरे राहू देणार नाहीत.

ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड

काल. सुमेध बप्पा शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त एल.एफ. सी. ग्रुप व काल. सुमेध बप्पा शिंदे विचार मंचच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्र परिवारांनी संकल्प केला की, आम्हाला बप्पांनी दिलेल्या गुरु शिक्षणाानुसार आम्ही गोरगरिबांची कायम सेवा करू आम्हाला आमचा ग्रुप बप्पा यांनी शिष्यांनी तारेवरची कसरत करत लढत राहायचे व कोणाला नडाईचे नसते आपण लढायचे असते व गोरगरिबांसाठी जीवन जगायचे असते असा आमचा नेता तथा आमचा गुरु सुमित बप्पा यांनी मोलाचा संदेश दिला आहे व तशी आम्हाला शिकवण दिलेली आहे.

काल. सुमेध बप्पा शिंदे कट्टर समर्थक व मित्रपरिवार



केज/प्रतिनिधी सुमेध बप्पा शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन एल.एफ. सी.ग्रुप व सुमेध बप्पा शिंदे विचार मंच,महाराष्ट्र राज्य, यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. लवकरच काल.सुमेध बप्पा शिंदे यांच्या नावाच्या चौकाचे सुशोभीकरण करणार आहोत असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी सुमेध बप्पा शिंदे यांच्या समृद्धीदिनानिमित्त त्यांच्या नावाच्या चौकास प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन केले यावेळी वार्तालाप करताना एल.एफ.सी.ग्रुप व काल. सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाच्या पदाधिकारी व मित्र परिवारांना आश्वासित केले व चौकाच्या सुशोभीकरणाच्या कामाचे श्रीफळ फोडून उद्घाटन केले.

१५ ऑगस्ट रोजी सुमेध बप्पा शिंदे यांचा वाढदिवस असतो त्यांच्या हयातीमध्ये शिंदे यांचा वाढदिवस मित्र परिवारांच्या व कार्यकर्त्यांच्या वतीने मोठ्या जल्लोषात साजरा केला जात होता.

सुमेध बप्पा शिंदे यांच्या मृत्यूनंतर त्यांचा पहिला वाढदिवस हा स्मृतिदिन म्हणून त्यांनी दिलेली शिकवण व त्यांचे प्रेरणा घेऊन त्यांच्या कार्याला उजळा देण्यासाठी आणि त्यांचे विचार आचरणात आणण्यासाठी, त्यांची आठवण सर्वांच्या स्मरणात राहण्यासाठी एल.एफ.सी. ग्रुप व सुमेध बप्पा शिंदे विचार मंच, महाराष्ट्र राज्य, व मित्र परिवाराच्या वतीने विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप करून विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले, या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे तर एल.एफ.सी.ग्रुप व काल सुमेध बप्पा विचार मंच आणि मित्र परिवाराचे आभार व्यक्त केले जात आहेत. दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ठीक ९-०० वाजता महात्मा फुले नगर भागातील ज्ञानप्रबोधिनी विद्यामंदिर, सकाळी ठीक१०-०० वाजता नालंदा विद्यालय, या दोन्हीही शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, फळे व खाऊंचे वाटप करण्यात आले. त्यानंतर दुपारी ११-१५ वा. दरम्यान केज-बीड रोडवरील उंबरी फाट्या जवळील मूक बधिर विद्यालय व मतिमंद विद्यालातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, फळांचे व खाऊचे वाटप करण्यात आले. दुपारी१-३० वाजता केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. रात्री ठीक ७-३० वा. दरम्यान महात्मा फुले नगर येथील एल.एफ. सी. चौक येथे काल. सुमेध बप्पा शिंदे यांच्या पहिल्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप दिपानी पूजा करून वंदन करण्यात आले यावेळी उपस्थित मान्यवर व मित्रपरिवार यांनी सामुदायिक बुद्ध वंदना ग्रहण करून शेवटी शरणतय घेऊन कार्यक्रमांचा समारोप करण्यात आला.याकार्यक्रमाचे प्रस्ताविक लखन हजारे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार आमोल मिसाळ यांनी मानले. यावेळी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते हरूनभाई इनामदार, केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. समाधान घुगे, डॉ. सुरज हजारे, ज्येष्ठ वक्ते, प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर, प्रशांत नेहरकर, मुख्याध्यापिका श्रीमती सूर्यवंशीमॅडम,मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे मॅडम व सुर्यवंशी मॅडम, नालंदा विद्यालयचे मुख्याध्यापक नंदकुमार मस्के ,ज्ञानप्रबोधिनी विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद देशमुख यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयाचे डॉक्टर, नर्स, ब्रदर, कर्मचारी व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली व त्यांचे या कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लखन हजारे, अशोक गायकवाड, पत्रकार तात्या गवळी, अमोल मिसाळ, विकी लोखंडे, सागर बनसोड, रोहित कसबे, पत्रकार विवेक बनसोड, किरण जोगदंड, अमोल मिसाळ, विनोद इनकर, शाहरुख पटेल,अशोक धिवार, राहुल इनकर, सुहास समुद्रे, पवन बनसोड,गणेश गालफाडे, अभिजीत तुपारे,प्रेम मस्के, आकाश शिंदे, संदेश ताकतोडे, रेवन आप्पा नखाते,प्रवीण लांडगे, आदित्य मस्के, सुरज वैरागे, आदित्य जावळे,ओम शिनगारे,बाळा भांगे, ओम, पत्रकार प्रदीप गायकवाड, सोनू लष्करे, कुणाल पोळ, सोनू जोगदंड, सोनू शेख यांच्यासह एल.एफ.सी.ग्रुप व काल.सुमेध बप्पा शिंदे विचार मंचाचे पदाधिकारी आणि मित्र परिवारांनी अथक परिश्रम घेतले व सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

# कुरेशी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मूक मोर्चास लातुरात भर पावसात मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद





लातूर : कुरेशी समाज व विविध संघटनांच्या वतीने लातुरात सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या भव्य मूक मोर्चास भर पावसातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकरी, व्यापारी, कुरेशी यांच्यावर गोरक्षकांच्या माध्यमातून होणाऱ्या अन्याय - अत्याचाराच्या विरोधात कुरेशी समाजाने एक महिन्यापासून पशूंची खरेदी, विक्री , कटाई बंद केली आहे. कुरेशी समाजावर होणाऱ्या या अन्यायाचा निषेध करण्यासाठी सदर भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात होते. सध्या लातूर शहर व परिसरात दमदार पावसाचे पुनरागमन झाले आहे. भर पावसातही गंज गोलाईमधील साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापासून हा मूक मोर्चा काढण्यात आला. मोर्चा दरम्यान अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी, महात्मा जोतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. अण्णाभाऊ साठे चौकातून निघालेला हा मूक मोर्चा गंज गोलाई, हनुमान चौक, मध्यवर्ती बस स्थानक, गांधी चौक या शहरातील प्रमुख मार्गावरून लातूर तहसील कार्यालयावर धडकला. मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, कार्याध्यक्ष सत्तार पटेल, कोअर कमिटी अध्यक्ष राजेंद्र मोरे, जिल्हाध्यक्ष अरुणदादा कुलकर्णी यांनी आपल्या भावना तीव्र शब्दात व्यक्त केल्या. तथाकथित गोरक्षकांकडून जाणीवपूर्वक शेतकरी बांधव, कुरेशी समाज, व्यापाऱ्यांना दिला जाणारा त्रास त्वरित थांबविण्यात यावा अशी आग्रही मागणी करण्यात आली. आपल्या व्यथा शासनापर्यंत पोहचविण्यात आल्या असल्या तरी लोकशाही मार्गाने लढा देण्याच्या उद्देशाने आजच्या या मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. तथाकथित गोरक्षकांच्या नावाखाली गावगुंडांकडून होत असलेली जनावरांची वाहतूक अडविणे, कायदा हातात घेऊन लूटमार करणे, मारहाण करणे, मॉब लिचिंगद्वारे हत्या करणे आदी प्रकरणात कठोरात कठोर कार्यवाही करून प्रतिबंध करणे, सर्व गोशाळेंची उच्च स्तरीय चौकशी करणे, मुस्लिम खाटीक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे, जनावरांच्या वाहतुकीसाठी वाहन कायद्यात बदल करणे, लातूर जिल्ह्यातील तालुका, नगर पालिका, ग्रामपंचायतच्या क्षेत्रात स्लॅटर हाऊसची निर्मिती करणे, शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य भाव देणे, पोलिसांमार्फत शेतकरी, व्यापारी, कुरेशी, वाहन चालक,यांच्यावर दाखल केलेले गुन्हे तात्काळ परत घ्यावेत, मॉबा लीचिंगद्वारे हत्या झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना मोबदला द्यावा आदी मागण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चात सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या हातात महापुरुषांच्या जयघोषासह आपल्याला न्याय मिळावा अशा आशयाचे फलक होते. गोमातेचे रक्षण झालेच पाहिजे असा फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेणारा ठरत होता. मोर्चामध्ये संविधान सेवा संघाच्या संस्थापक अध्यक्षा एड. शहेजादी शेख आपल्या हातात तिरंगा ध्वज घेऊन सहभागी झाल्या होत्या. अनेक मोर्चेकरांच्या हाती तिरंगा ध्वजासह आपल्या मागण्यांचे फलक दिसत होते. मोर्चा तहसील कार्यालयावर पोहचल्यानंतर ऑल इंडिया जमिअतुल कुरेश महाराष्ट्र राज्यचे उपाध्यक्ष अफजल कुरेशी यांनी सविस्तर असे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी या मूक मोर्चाच्या आयोजनामागची वस्तुस्थिती स्पष्ट शब्दात विशद केली. कुरेशी समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व न्याय मिळवून देण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी अफसर कुरेशी यांनी आभार प्रदर्शन केले. या मूक मोर्चात जमीअतुल कुरेशी कमिटी, लातूरचे जिल्हा अध्यक्ष हाजी इब्राहिम कुरेशी, उपाध्यक्ष फय्युम कुरेशी, सचिव अफसर कुरेशी, संविधान सेवा संघाच्या अध्यक्षा एड. शहेजादी शेख, उपाध्यक्ष एड. गोविंद सिरसाठ, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विधी आघाडीचे अध्यक्ष एड. विजय जाधव, इस्माईल कुरेशी, चांद कुरेशी, शफिक कुरेशी, जावेद कुरेशी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अनेक प्रमुख पदाधिकारी यांच्यासह हजारोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

## नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या - खा. रजनीताई पाटील



केज/प्रतिनिधी चार दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. रजनीताई पाटील यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. पाऊस, नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. नुकसानग्रस्त भागांचा तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल. त्यामुळे प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा. रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे सांगितले.

# रिपाइंच्या संकल्प मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- दीपक कांबळे

केज/प्रतिनिधी उपेक्षित घटकांच्या राजकीय हक्कासाठी रिपाइं (ए) च्याच वतीने केज येथे संकल्प मेळावा आयोजित केला असून या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी केले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशाने आणि युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, मराठवाड्याचे नेते मजहर खान आणि जिल्हा सचिव राजू जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत २५ ऑगस्ट रोजी केज येथे मुक्ताताई लॉन्स येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) चा संकल्प मेळावा आयोजित आहे. त्या निमीत दि. १७ ऑगस्ट रोजी तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी माहिती देण्यासाठी केज येथील शासकीय विश्राम गृहावर पत्रकार परिषद आयोजित केली होती. या वेळी मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा सल्लागार उत्तम आप्पा मस्के, जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड, तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, उपाध्यक्ष रमेश निशिगंध, उपाध्यक्ष विकास आरकडे, उपाध्यक्ष बाळासाहेब ओव्हाळ, आयटी सेलचे सुरज काळे, जेष्ठ नेते दिलीप बनसोडे, युवा रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष विकास मस्के, युवा रिपाइंचे निलेश ढोबळे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, ज्येष्ठ नेते ईश्वर सोनवणे, ज्येष्ठ नेते कपिल कागदे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे, जेष्ठ नेते अंबादास तुपारे, येवता सर्कल प्रमुख हरीश गायकवाड, युवक सरचिटणीस हरेंद्र तुपारे, युवक उपाध्यक्ष विनोद गायकवाड, युबा संघटक विनोद शिंदे, रोहित कांबळे, अविनाश गायकवाड, उत्कर्ष काळे, संगम कांबळे, समाधान जाधव, अक्षय जाधव, दत्ता जाधव, अनंत



काळे, सुमित काळे, बाळासाहेब जानराव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने केज शहरात होणाऱ्या संकल्प मेळाव्या निमित्त शासकीय विश्राम गृह केज आयोजित नियोजन बैठकीस मार्गदर्शन करताना तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यावेळी मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा सल्लागार उत्तमअप्पा मस्के, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड, युवा जिल्हाकार्य अध्यक्ष विकास मस्के, जैष्ठ नेते कपिलजी कागदे, जेष्ठ नेते दिलिप बनसोडे, जेष्ठ नेते ईश्वर भाऊ सोनवणे, तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, आयटी सेल तालुका अध्यक्ष सुरज काळे, तालुका उपाध्यक्ष रमेश निशिगंध, तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे, जेष्ठ नेते अंबादास तुपारे, येवता सर्कल प्रमुख हरीश गायकवाड, युवक सरचिटणीस हरेंद्र तुपारे, युवक उपाध्यक्ष विनोद गायकवाड, युबा संघटक विनोद शिंदे, रोहित कांबळे, अविनाश गायकवाड, उत्कर्ष काळे, संगम कांबळे, समाधान जाधव, अक्षय जाधव, दत्ता जाधव, अनंत काळे, सुमित काळे, बाळासाहेब जानराव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संवाद साधताना दीपक कांबळे म्हणाले की, स्वातंत्र्य मिळून देशाला ८९ वर्ष झाली तरी उपेक्षित आणि वंचित घटकांना खऱ्या अर्थाने राजकीय न्याय मिळत नाही. आरक्षण हे केवळ नावालाव असून आरक्षणाच्या आडून त्याचा गैरवापर होत आहे. त्यासाठी संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे. आता आम्ही उपेक्षित घटकांच्या हक्कासाठी संघर्ष करणार असून देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले आणि पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली लढा उभारण्याचे त्यांनी संकेत दिले. शेवटी त्यांनी मेळावा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे आणि जास्तीत जास्त संख्येने आपल्या न्याय व संवैधानिक मागण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## तहसीलदार यांनी भरपावसात जवळबंन येथील वंचितांना दिला न्याय तहसीलदार राकेश गिड्डे यांनी वंचितांना दिलेला शब्द केला पूर्ण

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील जवळबन येथील वंचितांना न्याय देण्यासाठी केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे हे भरपावसात थांबून वंचित घटकातील पारधी समाज बांधवांना न्याय मिळवून दिला आहे. तहसील कार्यालयाच्या समोर पारधी समाज बांधव हे उपोषणाला बसले असता तहसीलदार राकेश गिड्डे यांनी वंचितांना दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल पारधी समाज बांधवांनी तहसीलदार राकेश गिड्डे यांचे आभार मानले. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील जवळबन येथील स.नं.१३७ मधील गायरानामध्ये पारधी समाज बांधव हे मागील चार पिढ्यापासून राहत होते. सदर ठिकाणी पारधी समाज हा राहत असल्यामुळे त्यांच्या कुटुंबातील व्यक्ति मृत्त झाल्या नंतर सदर गायरानामध्ये त्यांचा मृत्यूदेह दफन करण्यात आलेले आहेत त्या ठिकाणी त्यांच्या पूर्वजांच्या पारधी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे समाधी बांधण्यात आलेल्या आहेत. सदर सर्वे नंबर मध्ये प्रशासनाने एका खाजगी कंपनी मार्फत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम चालू केले आहे. त्यामुळे वंचित घटकातील पारधी समाज बेघर होण्याची वेळ आली होती. पारधी समाज बांधव हे गेल्या चार पिढ्यापासून जवळबन येथे वास्तव्य करत आहेत त्यांच्याकडे रहिवाशी पुरावे देखील असताना अद्यापही शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळाला नाही आज रोजी पारधी समाज बांधव हे शासनाच्या लाभापासून वंचित राहिलेले आहेत. अशातच प्रशासनामार्फत उभारण्यात येत असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे पारधी समाज बांधवांवर राहण्याचे मोठे संकट निर्माण झाले होते. त्यामुळे पारधी समाज बांधव हे तहसील प्रशासनासह संबंधित कार्यालयाकडे राहण्यासाठी व त्यांच्या पूर्वजांच्या समाधी असलेल्या ठिकाणी स्मशानभूमी साठी जागा देण्यात यावी अशी मागणी वेळोवेळी लेखी निवेदनाद्वारे करत होते परंतु त्यांच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या नव्हत्या म्हणून दिनांक १५ ऑगस्ट रोजी केज तहसील कार्यालयाच्या समोर वंचित घटकातील पारधी समाज बांधव हे त्यांच्या कुटुंबासमवेत आमरण उपोषणास बसले होते. तहसीलदार राकेश गिड्डे यांनी सदर उपोषणाची दखल घेऊन उपोषणकर्त्यांना लेखी पत्र देऊन त्यांचे उपोषण मागे घेऊन शासनास सहकार्य करावे असे आवाहन केले व त्यांना राहण्यासाठी व त्यांच्या पूर्वजांच्या समाधी असलेल्या ठिकाणी स्मशानभूमीसाठी शासनाच्या



नियमानुसार जागा देऊ असे लेखी पत्र देऊन आश्वासित केले आणि सोमवार रोजी प्रत्यक्षात सदर ठिकाणी भेट देऊन पाहणी करून तुमचा प्रश्न मार्गी लावतो असे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी पारधी समाज बांधव व चळवळीतील कार्यकर्ते यांच्या समवेत चर्चा केल्यानंतर सदरचे आमरण उपोषण पारधी समाज बांधवांनी मागे घेतले होते. तहसीलदार राकेश गिड्डे यांनी पारधी समाज बांधवांना दिलेल्या शब्दाप्रमाणे ते जवळबन येथील गायरान जमीन येथे भर पावसामध्ये जाऊन संबंधित कंपनी च्या अधिकारी व ग्रामस्थ आणि पारधी समाज बांधव व केज तालुक्यातील चळवळतील पक्षाचे व संघटनेचे पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा करून पारधी समाज बांधव यांना राहण्यासाठी व त्यांच्या पूर्वजांच्या समाधी असलेल्या ठिकाणी त्यांना स्मशानभूमीसाठी जागा देण्याच्या सूचना संबंधित कंपनीला व महसूल प्रशासनातील त्यांच्या कर्मचाऱ्याला दिल्या आहेत. जवळबन येथील रहिवासी असलेले वंचित घटकातील पारधी समाज बांधवांचा मागील चार पिढ्यापासून राहण्यासाठी व स्मशानभूमीसाठी प्रलंबित असलेला प्रश्न हा तहसीलदार राकेश गिड्डे यांनी मार्गी लावला त्याबद्दल त्यांचे व केज तालुक्यातील चळवळीतील विविध संघटना, पक्षाचे व पत्रकार बांधवांचे पारधी समाज बांधवांनी आभार मानले. यावेळी तहसीलदार राकेश, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष चंद्रकांत खरात सर, केज तालुका दलित अन्य अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे सह समितीचे पदाधिकारी, विविध संघटना व पक्षाचे पदाधिकारी व तहसीलचे कर्मचारी, संबंधित कंपनीचे अधिकारी,कर्मचारी व शेतकरी, ग्रामस्थ आणि पारधी समाज बांधव उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE